## निवडक



पिंपरी : नवराष्ट्र विद्यालयात थेट भेट कार्यक्रमात पोलिसांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

# पिंपरी येथील नवराष्ट्र विद्यालयात पोलिसांशी विद्यार्थ्यांची थेट भेट

**पिंपरी, दि. १६ (प्रतिनिधी) –** पंख सामाजिक संस्था आणि क्विक हील फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमानाने शाळांगण प्रकल्पाअंतर्गत पिंपरी वाघिरे येथील नवराष्ट्र विद्यालय आणि महाविद्यालयातील इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी पोलिसांशी थेट भेट कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. छेडछाड, प्रेम–मैत्री, आकर्षण व कायदा, पॉस्को कायद्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. पंखच्या अध्यक्षा स्मिता आपटे, पिंपरी पोलीस मार्शल दीपक खुणवे, सुप्रिया पारसे यांनी मार्गदर्शन केले. पंख संस्थेच्या समुपदेशकांनी चर्चेतून खरं प्रेम, निखळ मैत्री, करिअर, लग्न आणि सेटलमेंट अशा महत्त्वाच्या संकल्पना समजावल्या. पोलीस मार्शल सुप्रिया पारसे यांनी प्रेमसंबंध, शारीरिक संबंध, छेडछाड अशा प्रकरणात होणाऱ्या शिक्षेबद्दल माहिती दिली.